महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
द्वारा : श्री. वासुदेव बालारामजी वाघमारे, यांची इमारत राजगोपालाचारी वार्ड, पंजाब नॅशनल बँकेसमोर महाल रोड, भंडारा
दुरध्वनी क्रमांक ०७१८४ - २५२७१९
Website:- www.charity.maharashtra.gov.in Email – supdtest.bh-mh@gov.in

जा.क्र./आस्था./ /२०२५ दिनांक - / /२०२५

**माननीय उपसचिव विधी व न्याय विभाग यांचे पत्र सीएचए-२०२४/प्र.क्र. ९९/का-१ दि.०३ जानेवारी २०२५ अन्वये सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, भंडारा येथील २ शिपाई व १ पहारेकरी या पदांची सेवा ११ महिन्यांच्या करार पद्धतीने वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक २९, जानेवारी २०२० तसेच वित्त विभाग, मंत्रालय शासन निर्णय क्र. पदनि-२०२२/ प्र.क्र.१५/आ.पु.क., दि. २७ एप्रिल, २०२२ (बाह्ययंत्रणा सूचना) अन्वये शिपाई पदाकरिता तसेच पहारेकरी पदाकरिता रु. १९७२३/- या मानधनावर घेणेकरिता खालील कराराच्या अटी शर्तींवर नोंदणीकृत ठेकेदार / कंपनी / संस्थेंकडून निविदा मागविण्यात येत आहे.**

शिपाई, पहारेकरी या पदावर कंत्राटी पध्दतीने आवश्यक असलेल्या कर्मचा-यांचा गोषवारा खालील प्रमाणे आहे.

| कार्यालयाचे नाव | आवश्यक असलेल्या शिपाई, पहारेकरी पदावरील कर्मचा-यांची संख्या | मानधन |
|---|---|---|
| **सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, भंडारा** | शिपाई – ०२ | रु. १९७२३/- प्रत्येक पदाकरिता |
| | पहारेकरी – ०१ | रु. १९७२३/- |
| | एकूण - ०३ | |

सदरील निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१. निविदे सोबत जोडलेले सर्व कागदपत्रे साक्षांकीत असावेत.
२. निविदा धाराकास त्यांचेकरिता अस्तित्वात असलेल्या अनुषांगीक सर्व कायद्यांचे पालन करणे बंधनकारक राहील.
३. खाजगी कर्मचाऱ्यांचा भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजनांची रक्कम प्रचलीत दरानुसार कपात करून त्याचा भरणा संबंधित कार्यालयात केल्याची पावती या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.
४. खाजगी कर्मचाऱ्यांचे वयोमर्यादा कमीत कमी १८ वर्ष व जास्तीत जास्त ४५ वर्ष राहील.
५. खाजगी कर्मचाऱ्यांचे शिक्षण किमान १२ वी पास असणे आवश्यक आहे त्यांच बरोबर विशेष शिक्षण जसे की टंकलेखन व संगणक अनुभव असणाऱ्या खाजगी कर्मचाऱ्यांस प्राधान्य देण्यात येईल.

६. व्यसनाधीन, गुन्हेगारी पार्श्वभुमी असणाऱ्या खाजगी कर्मचाऱ्यास नियुक्ती देता येणार नाही. खाजगी कर्मचाऱ्यास नियुक्तीनंतर चारित्र्य पडताळणी करुन घेणे बंधनकारक राहील. सदर पडताळणीच्या अधीन राहून सेवा सलग करण्यात येईल.

७. बेशीस्त वर्तन करणाऱ्या कर्मचाऱ्यास या कार्यालयाने निर्देशीत केल्यावर त्वरीत काढुन घ्यावे लागेल.

८. खाजगी कर्मचाऱ्यांना आठवडी सुटी देणे बंधनकारक राहील. किमान वेतनामध्ये साप्ताहीक सुटीचा समावेश असेल. खाजगी कर्मचाऱ्यांच्या सुट्टीबाबत वेगळे कार्यालयीन आदेश निर्गमित करण्यात येतील.

९. सदरील कर्मचाऱ्यांचा अपघात झाल्यास नियमाप्रमाणे खर्चाची पुर्तता करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१०. नियमीत आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांस मिळणारे कोणतेही फायदे कंत्राटी कर्मचाऱ्यांना देय राहणार नाही.

११. कुठलेही कारण न देता, कुठल्याही वेळी कंत्राट रद्द करण्याचे सर्व अधिकार सहायक धर्मादाय आयुक्त, भंडारा यांना असतील.

१२. कंपनी / एजन्सी / संस्थेतर्फे काम करण्याच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व या कार्यालयावर राहणार नाही.

१३. निविदा मंजुर झाल्यावर संबंधीत निविदा धारकास / कंत्राटदारास या कार्यालयाशी करार करावा लागेल.

१४. निविदा अर्ज पांढऱ्या कागदावर टंकलिखीत करुन शिपाई, पहारेकरी या पदाच्या सेवेसाठी निविदा असे नमूद करून बंद लिफाफा वरील पत्त्यावर दिनांक ०२.०४.२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करणे करणे आवश्यक आहे. निविदे सोबत संस्था / कंपनी / एजन्सी शासनमान्य असल्याबाबतचे प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रत जोडणे आवश्यक आहे.

१५. सदरील निविदा सुचना charity.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

NRMalode
18/03/2025

स्थळ :- भंडारा
दिनांक :- १८.०३.२०२५

सहायक धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
भंडारा

प्रत :- १) charity.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्धीकरिता
२) जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा यांचे नोटीसबोर्डवर
३) कार्यालयीन नोटीस बोर्ड